झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा /सप्रा-१/पर्वती/ ८२३ /२०२५
दिनांक २५/०७/२०२५

# झोपडपट्टी पुनर्वसन अंतिम आदेश

**(महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये अंतिम अधिसूचना)**

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **उक्त अधिनियम** असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि. ३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे; आणि

(२) ज्याअर्थी, पुणे महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमुद गाव पर्वती स.नं. ५४/२,सि.स.नं.३६११ पै.,येथील झोपडपट्टी क्षेत्रावर अंदाजे क्षेत्रफळ ६४०६.५३ चौ.मी (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख यापुढे सदर क्षेत्र असा करणेत येत आहे) हे क्षेत्र पुणे महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टयांच्या या प्राधिकरणाकडील यादीमध्ये समाविष्ट करणेत आलेले आहे; आणि

(३) ज्याअर्थी, अनुसुचनेमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र 'झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र' म्हणून घोषित करण्याची दि.१९/०१/२०२४ रोजीची पुर्वसूचना प्रकरणातील सविस्तर पार्श्वभूमी नमूद करून महाराष्ट्र शासन राजपत्र दि.०८-१४ फेब्रुवारी, २०२४ पान क्र.१०-११ वर, तसेच दैनिक लोकसत्ता या वर्तमानपत्रामध्ये दि.२५/०१/२०२४ रोजी प्रसिध्द करणेत आली आहे. तसेच, सदरची पुर्वसूचना सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसुन येईल अशा प्रत्यक्ष योजना क्षेत्रामधील/ झोपडपट्टीमधील जागेवर डकवून प्रसिद्ध करण्यात आली आहे; आणि

(४) ज्याअर्थी, नस्तीत दाखल अतितातडी मो.र.नं. ९०२६/२०१२, दि. ११/१२/२०१२ अन्वये सदर क्षेत्राचा मोजणी नकाशा सादर केला असून त्रिमितीय पद्धतीनुसार आलेले क्षेत्र ७३८१.५४ चौ.मी.असल्याचे दिसून येत असल्यामुळे सदर मिळकतीची पूर्वसूचना प्रसिद्ध करतेवेळी ७३८१.५४ चौ.मी क्षेत्र विचारात घेण्यात आलेले होते.परंतु सद्यस्थितीत विकासक यांनी अद्यावत मोजणी नकाशा सादर केला असून त्यानुषंगाने उपअधीक्षक भूमी अभिलेख,झोपुप्रा.,पुणे यांच्या दि.०१/०४/२०२५ रोजीच्या पत्रान्वये ६४०६.५३ चौ.मी.इतके क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र अंतिम आदेशाकरिता विचारात घेणेत येत आहे.

(५) ज्याअर्थी, सदरच्या प्राथमिक आदेशाद्वारे मालकी हक्क प्राप्त असलेले खाजगी व्यक्ती / शासकिय विभाग / सार्वजनिक प्राधिकरणे / स्थानिक संस्था तसेच सदर क्षेत्राबाबत इतर संबंधितांना प्रत्यक्ष सुनावणीची संधी देण्यात आली असुन कोणतेही आक्षेप / हरकती / सूचना / दावे सादर झाले नाहीत; आणि

(६) ज्याअर्थी, उपरोक्त खालील अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या क्षेत्राच्या बाबतीत झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित केले जाणे समर्थनीय ठरविणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री पटली आहे;

त्याअर्थी, मी नीलेश गटणे, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे, उक्त अधिनियमाच्या कलम ३क (१) मधील नमूद तरतूदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये सदरचा झोपडपट्टी पुनर्वसन आदेश कायम करून खालील अनुसूचिमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करीत आहे;

सदरच्या आदेशामुळे बाधित होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, उक्त अधिनियमाच्या कलम ३क (२) मधील तरतूदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मा.शिखर तक्रार निवारण समिती, वांद्रे, मुंबई येथे अपील दाखल करता येईल आणि अशा अपिलावरील शिखर तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम राहील.

## अनुसूची

झोपडपट्टीचे नाव : स.नं.५४/२, सि.स.नं.३६११ पै., पर्वती, पुणे
महानगरपालिका क्षेत्र : पुणे महानगरपालिका

| गाव | स.नं. | पुर्वसूचने मध्ये नमुद क्षेत्र (चौ. मी.) | घट | झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणुन अंतिम अधिसूचित क्षेत्र (चौ.मी.) | जमीनीचे मालकी हक्क / विकसन हक्क प्राप्त असलेल्या व्यक्ती / संस्थेचे नाव | चतु:सिमा | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पर्वती | स.नं.५४/२, सि.स.नं.३६११ पै. | ७३८१.५४ चौ.मी. | ९७५.०१ चौ. मी. | ६४०६.५३ चौ. मी. | खाजगी | पुर्वेस - लागु रस्ता<br>दक्षिणेस - लागु रस्ता<br>पश्चिमेस - लागु रस्ता<br>उत्तरेस - सि.स.नं.३६११ पै. उर्वरीत मिळकत | |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देणेत आला आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
दिनांक :- / /२०२५

(नीलेश गटणे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

सर्व्हेक्षक   ना. तहसिलदार   तहसिलदार   सक्षम प्राधिकारी क्र. १

प्रत :-

१. मा.जिल्हाधिकारी,पुणे जिल्हा,पुणे यांना माहितीस्तव व पुढील उचित कार्यवाहीस्तव सादर.
२. मा.आयुक्त,पुणे महानगरपालिका,पुणे यांना माहितीस्तव व पुढील उचित कार्यवाहीस्तव सादर.
३. विकसक मे. असेंन्ट व्हर्टीकॉन डेव्हलपर्स, ८१३, प्रदिप चेंबर्स, भांडारकर रोड, पुणे - ४११००४